## ** परीक्षा केंद्रावर विशेषत: महिला उमेदवारांसाठी महत्वाची सूचना **

टिप - उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवाराने आपल्या सोवत नविनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सद्यास्थितीत वैध असे मुळ स्वरुपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नांव (ऑनलाईन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/ मधले/ अंतिम नाव बदलले आहे, त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो / नांव आणि ओळखपत्रावरील फोटोत / नावात कोणताही फरक / विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस वसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावांत वदल केला असेल, अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना / मूळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तूत केले तरच त्यांना परीक्षेस वसण्यास अनुमती देण्यात येईल. ज्या महिला उमेदवारांच्या नावात विवाहानंतर वदल झाला असेल त्यांनी यावावात विशेष खवरदारी घेणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो, ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.
उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्रात दिलेल्या सूचनांची प्रिंट काढावी व काळजीपूर्वक वाचन करावे.

दिनांक - 13 जून 2024
ठिकाण - भंडारा

(समीर कुर्तकोटी)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

13/06/2024 Office letter 12-10-020

Scanned with CamScanner